Peer Reviewed

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Oct. 2022 Issue - 60 Vol. 1

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

SHIVAJI COLLEGE HINGOLI




32. लोकशाही आणि मतदानाचा हक्क — 110
प्रा. रमेश एकनाथ भारुडकर

33. "नांदेड जिल्ह्यातील उच्च माध्यमिक स्तरावरील आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांचा एक अभ्यास" — 112
स्मिता रामलू लखमावाड , डॉ.ए.पी. गिनगिने

34. भारतीय लोकशाहीतील प्रसारमाध्यमांची भूमिका व महत्व — 115
**श्री. मुंगल ऋषिकेश विश्वांबर**

35. पं. दीनदयाळ उपाध्याय यांचे लोकशाही व विकेंद्रीकरणाबद्दलचे विचार — 119
डॉ. प्रदीप बस्वराज पाटील

36. लोकशाहीतील प्रसारमाध्यमाची भूमिका आणि महत्त्व — 123
प्रा.डॉ.संजय कोनाळे

37. भारतीय लोकशाहीसाठी सुधारणात्मक उपाय : मतदार जागृती अभियान — 126
सतीश गणपतराव उढाण

38. महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल एक समस्या — 129
प्रा. लोडे परमेश्वर लिंबाजी

39. भारतीय लोकशाहीसाठी भारतीय प्रसार माध्यमाची भूमिका — 131
डॉ.राजाराम पिंपळपल्ले

40. भारतीय लोकशाहीतील जातीयवाद : एक आव्हान — 134
प्रा.मदनहरिसिंग जाधव

41. भारतीय लोकशाही आणी प्रशासकीय सुधारणा — 138
प्रा . खंदारे के.जे.

42. लोकशाही आणि समाजमन — 141
प्रा. डॉ. पुरुषोत्तम शेषराव जुन्रे,

43. भारतीय लोकशाही समोरील सामाजिक समस्या व आव्हाने — 145
डॉं. हुरगुळे निवृती रंगनाथ

44. लोकशाही सिद्धांत आणि आवश्यकता — 148
प्रा. डॉ. रमेश शेवाळे

45. "भारतीय लोकशाही आणि मुलभूत गरजा" — 152
प्रा. संदिप कुऱ्हाडे , प्रा. राधा मुरुमकार

46. भारतातील दारिद्र्य एक आव्हान — 154
प्रा.डॉ.रामदास डी. मुकटे


Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

COLLEGE HINGOLI

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 60 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Oct. 2022 | SJIF | Impact Factor : 7.139

# भारतातील दारिद्र्य एक आव्हान

प्रा.डॉ.रामदास डी. मुकटे
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

---

**प्रस्तावना**

दारिद्र्याची संकल्पना ही जागतिक संकल्पना आहे. कारण जगातील अनेक देश या संकल्पनेला सामोरे जात असताना दिसून येते. अमेरिकेसारख्या विकसित देशातही 15 टक्के जनता दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहे. भारतातील दारिद्र्य आणि जगातील इतर देशातील दारिद्र्य यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात तफावत आहे भारतातील दारिद्र्याची गंभीरता ही प्रभावशाली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत सद्यस्थितीत जी विविध प्रकारची आव्हाने निर्माण झालेली आहेत त्यापैकी दारिद्र्य हे एक आव्हान आहे. भारतात स्वातंत्र्यापासून ते आज पर्यंत दारिद्र्याची समस्या दूर करण्याचा प्रयत्न अविरतपणे शासनाकडून केला जात आहे.तरी परंतु आजही ही समस्या संपुष्टात आलेले नाही तर हे एक भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हान निर्माण झाले आहे. दारिद्र्य ही समस्या आर्थिक समस्या आहे असे नाही तर ती एक सामाजिक प्रक्रिया आहे. कारण दारिद्र्य व्यक्ती हे समाजातील एक अविभाज्य घटक आहे त्यामुळे दारिद्र्य कमी करण्यामध्ये आर्थिक घटकांबरोबरच सामाजिक घटकांचीही महत्त्वाची भूमिका आहे. भारतात असणारी आर्थिक विषमता आणि सामाजिक सद्भावांचा अभाव यामुळे दारिद्र्याचे संकट अर्थव्यवस्थेत पसरलेले आहे.

**संशोधनाची आवश्यकता**

भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाला निर्माण झालेले अडसर त्यापैकी दारिद्र्य ही एक अडसर आहे. दारिद्र्य कमी करण्याचा प्रयत्न करूनही अर्थव्यवस्थेतील दारिद्र्य कमी होत नाही हा एक संशोधनाचा विषय आहे. दारिद्र्याचे स्वरूप आणि गंभीरता विषयक अभ्यास करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन प्रस्तुत संशोधन लेखाचे लिखाण करण्यात आले आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोध निबंध हा संशोधन पद्धतीच्या द्वितीय पद्धतीवर आधारित आहे. संशोधनाच्या दुय्यम साधनांचा की,ज्यामध्ये संशोधन विषयक संदर्भ ग्रंथ, क्रमिक पुस्तके, दारिद्र्य विषयक अहवाल, अभ्यासकांची लेख, मासिके,वृत्तपत्रे, वेबसाईट, युट्युब चॅनेल यासारख्या साधनाच्या मदतीने संशोधनासाठी आवश्यक असलेली सामग्री उपलब्ध करण्यात आली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. भारतातील दारिद्र्याची वास्तवता अभ्यास करणे.
2. दारिद्र्य हे भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हान कसे आहे याचे विश्लेषण करणे.
3. दारिद्र्य कमी करण्याच्या उपायोजनाचा आढावा घेणे.

**विषय विवेचन**

ज्या व्यक्ती आपल्या उत्पन्नातून किमान गरजांची पूर्तता करू शकत नाही अशा व्यक्ती किंवा व्यक्ती गटाला आपण दारिद्र्य या नावाने ओळखतो. जागतिक स्तरावर दारिद्र्य प्रमुख दोन प्रकार आहेत त्यामध्ये सापेक्ष दारिद्र्य आणि निरपेक्ष दारिद्र्य ही आहेत. विकसित देश अमेरिका यामध्ये सापेक्ष दारिद्र्याची संकल्पना स्वीकारलेली आहे. त्यामध्ये दोन व्यक्तीच्या उत्पन्न व राहणीमानाची तुलना करून दारिद्र्य ठरवलं जात. भारतामध्ये निरपेक्ष दारिद्र्याची संकल्पना आपण स्वीकारलेली आहे त्यामध्ये व्यक्तीला विशिष्ट प्रकारचे जीवन जगण्याचा स्तर निश्चित केला जातो या स्तरापर्यंत जे व्यक्ती पोहोचू शकत नाही त्याला आपण दारिद्र्य म्हणतो. भारतात दारिद्र्याचे निश्चिती करण्यासाठी दारिद्र्यरेषेचा वापर केला जातो.दारिद्र्याच्या प्रमाणाचे निरपेक्ष मोजमाप करण्यासाठी देशातील जीवनमान खर्चाचा विचार करून त्या आधारावर एक न्यूनतम उपभोग स्तर निर्धारित केला जातो. भारतात या न्यूनतम उपभोग स्तारालाच दारिद्र्य रेषा असे म्हणतात.

राष्ट्र व राज्य पातळीवरील दारिद्र्याचे प्रमाण निश्चित करण्यासाठी नियोजन आयोग नोडल एजन्सी म्हणून कार्य करते.त्यासाठी NSSO मार्फत साधारणत: दर पाच वर्षांनी हाती घेण्यात आलेल्या घरगुती उपभोग खर्चावरील नमुना सर्वेक्षणाचा आधार घेतला जातो.'1973-74 पासून नियोजन आयोग दारिद्र्य रेषा ठरविण्यासाठी पुढील दोन निकषांचा वापर करीत आहे.

1. दरडोई प्रतिदिन उष्मांक उपभोग (Per Capita per day calorie intake) या निकषानुसार ग्रामीण भागात दरडोई प्रतिदिन किमान उष्मांक उपभोग 2400 कॅलरी, तर शहरी भागात तो किमान 2100 कॅलरी एवढा ठरविण्यात आला आहे.अर्थात दारिद्र्य रेषा मोजण्यासाठी कॅलरी मूल्यांचे रूपांतर पैशात (equivalent मनी value) केले जाते.

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

2. दरडोई प्रतिमाह उपभोग खर्च (Per Capita Per Month Consumption Expenditure) –

या निकषानुसार दारिद्र्य रेषा 2004-2005 मध्ये (आधारभूत वर्ष: 1973-74) ग्रामीण भागात दरडोई प्रतिमाह उपभोग खर्च रु. 356.30 तर शहरी भागात तो रु. 538.60 एवढी ठरविण्यात आली आहे.

यावरून जी कुटुंबे दारिद्र्य रेषेपेक्षा कमी खर्च करतात त्यांना 'दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे' (Below Poverty Line: BPL) तर जी कुटुंबे दारिद्र्य रेषेपेक्षा जास्त खर्च करतात त्यांना 'दारिद्र्य रेषेवरील कुटुंबे' (Above Poverty Line:APL) असे संबोधले जाते'.[1]

भारतातील दारिद्र्य निश्चिती करण्यामध्ये उष्मांक आणि उपभोग खर्च या निकषावर अनेक अभ्यासकांनी टीका करुन त्यामध्ये सुधारणा सुचविल्या या आधारे केंद्र सरकारने गणन पद्धतीमध्ये सुधारणा करण्यासाठी सरकारने अलिकडे दोन समित्य केल्या होत्या. केंद्र सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने ही 1.एन.सी.सक्सेना यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती (Committee for Estimation of BPL Families in Rural Areas) स्थापन केली होती.या समितीने सप्टेंबर 2009 मध्ये अहवाल सादर केली होती. या समितीने सद्यस्थितीतील दारिद्र्य रेषा अपूर्ण असून त्यात वाढ सुचविली, जेणे करून आवश्यक कॅलरीज उपलब्ध होऊ शकतील. तसेच समितीच्या मते दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या 50 टक्के इतकी उच्च आहे. मात्र या शिफारशी नियोजन मंडळाने फेटाळून लावल्या.

2. सुरेश तेंडुलकर समिती केंद्रीय नियोजन मंडळाने या समितीची स्थापना नोव्हेंबर 2009 मध्ये केली, व तिने आपला अहवाल 8 डिसेंबर, 2009 रोजी सादर केला.

**या समितीच्या महत्वाच्या शिफारसी पुढीलप्रमाणे-**

समितीने दारिद्र्य रेषा मोजण्यासाठी कॅलरीच्या निकषाचा वापर सोडून देण्याची शिफारस केली आहे, कारण समितीच्या मते कॅलरी उपभोग व पोषण यांमध्ये परस्परसंबंध कमी आहे.समितीने दारिद्र्य रेषेच्या मोजमापासाठी नवीन पद्धत सुचविली आहे, ज्यामध्ये आरोग्य व शिक्षणावरील खर्चाचाही समावेश करण्यात आला आहे. तसेच शहरी दारिद्र्य रेषेलाच इतर दारिद्र्य रेषांचा आधार मानण्याचीहि शिफारस समितीने केली आहे.'नियोजन मंडळाने सध्या ग्राह्य मानलेल्या दारिद्र्य रेषेच्या (356.3 रु. ग्रामीण भागात, व 538.60 रु. शहरी भागात) जागी तेंडुलकर समितीने नवीन निकषांच्या आधारावर 2004-05 साठी ग्रामीण भागासाठी 446.68 रु.तर शहरी भागासाठी 578.8 रु. अशी दारिद्र्य रेषा सुचविली आहे.या दारिद्र्य रेषेच्या आधारावर समितीने देशातील दारिद्र्याचे प्रमाण 37.2 टक्के, ग्रामीण भागात 41.8 टक्के तर एकूण 25.7 टक्के इतके असल्याचे संगितले आहे.नियोजन मंडळाने तेंडुलकर समितीने केलेल्या शिफारशी आणि दारिद्र्य रेषेच्या मोजमाप पद्धतीचा स्विकार केला. या पद्धतीनुसार, दारिद्र्य रेषा शहरासाठी 28.65 रु. प्रति दिन उपभोग खर्च, तर ग्रामीण भागासाठी 22.42 रु. प्रति दिन उपभोग खर्च, इतकी ठरविण्यात आली'.[2]

भारताच्या नियोजित आर्थिक विकासाचे जी प्रमुख उद्दिष्ट आहेत त्यापैकी दारिद्र्य निर्मूलन हे एक उद्दिष्ट असल्याचे दिसते. स्वातंत्र्यापासून हे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न चालू आहे. '1948 मध्ये नियोजन मंडळाचे अध्यक्ष म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू यांनी प्रतिपादन केले की, लोकांच्या राहणीमानात पुरेशा प्रमाणात वाढ करणे यावर भर राहील'[3] म्हणजेच दारिद्र्य निवारण करण्यात येईल. या सर्व प्रयत्नांची यश म्हणून भारतातील दारिद्र्याचे प्रमाण हे कमी झाले आहे. दारिद्र्याचे अभ्यासक ओझा यांच्या अंदाजाप्रमाणे 'सन 1960-61 मध्ये भारतातील ग्रामीण भागात 51.8% तर शहरी भागात 44% जनता ही दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत होती.1970-71 मध्ये हे प्रमाण 40.37% पर्यंत कमी झाले आहे.'[4] 'जागतिक बँकेच्या अहवालानुसार 2011 ते 2019 या आठ वर्षांच्या कालावधीमध्ये दारिद्र्याचे प्रमाण 12.3% कमी झालेले आहे. 2011 मध्ये 22.5%असणारे दारिद्र्याचे प्रमाण 2019 मध्ये 10.2% पर्यंत कमी झाले'.[5] भारतात सर्वात अधिक दारिद्र्य असणारे पाच राज्य म्हणून 'छत्तीसगड 48% मणिपूर 47.7% ओडिसा 46% मध्य प्रदेश 44% झारखंड ४२ % असे दारिद्र्याचे प्रमाण असलेले राज्य आहेत. महाराष्ट्रात 20 टक्के जनता ही दारिद्र रेषेखालील जीवन जगते'.[6]

भारतात दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी ज्या विविध प्रकारच्या उपाय-योजनाआहेत त्या एकूण उपाय-योजनांचे प्रमुख तीन भागांमध्ये विभाजन केले जाते व त्या आधारे दारिद्र्य निर्मूलन करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामध्ये A. स्वयंरोजगाराचे कार्यक्रम: उदा. स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना.B.मजुरी रोजगार कार्यक्रम: उदा. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना.स्वयंरोजगार व मजुरी रोजगारांचे एकत्रीकरण असलेल्या योजना: उदा. स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजना.C.किमान मूलभूत सुविधा: या दृष्टिकोनात जनतेला किमान गरजा पूर्ण करण्याची साधने उपलब्ध करून देऊन दरिद्र्याचा प्रश्न हाताळण्याचा समावेश होतो.सामाजिक उपभोगाच्या गरजांवर (उदा. अनुदानित दराने अन्नधान्य पुरवठा, शिक्षण व आरोग्य सोयी, पाणी पुरवठा व स्वच्छता इ.) सार्वजनिक खर्चाच्या माध्यमातून जनतेचे राहणीमान उंचवता येऊ शकते, या कल्पनेचा भारत हा जगात अग्रेसर देश असल्याचे मानले जाते.

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

गरिबांच्या अन्न व पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी पुढील तीन प्रमुख कार्यक्रम राबविले जात आहेत. 1 सार्वजनिक वितरण व्यवस्था 2.एकात्मिक बाल विकास योजना 3.राष्ट्रीय मध्यान्न आहार/भोजन या प्रमुख कार्यक्रमांमध्ये पुढील योजनांचा समावेश होतो. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना,प्रधानमंत्री ग्रामोदय योजना,भारत निर्माण योजना,इंदिरा आवास योजना,ग्रामीण गरीबांना शहरी सेवांचा पुरवठा (PURA) तसेच, सरकारने काही विशिष्ट गटांना मदत करण्यासाठी विशेष सामाजिक सुरक्षेच्या योजना सुरू केल्या आहेत. उदा. राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम (NSAP), ज्यांतर्गत 'इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धावस्था पेन्शन योजना' चालविली जाते.

अशा प्रकारचे अनेक प्रयत्न करूनही सद्यस्थितीतही भारतात प्रचंड वाढणारी लोकसंख्या, लोकसंख्या वाढीच्या तुलनेमध्ये विकासाचा दर अल्प असणे, रोजगारभिमुख शिक्षण पद्धतीचा अवलंबून नसणे,स्वयंरोजगार यावर अल्प प्रमाणात भर देणे, यांत्रिकीकरण आणि औद्योगीकरणाचे अल्प प्रमाण या अशा अनेक कारणामुळे भारतात मोठ्या प्रमाणात दारिद्र्याचे प्रमाण असल्याचे दिसून येते. भारतातील दारिद्र्याची समस्या ही गंभीर स्वरूप धारण करत आहे. अर्थव्यवस्थेच्या विकासाला हा एक गतिरोधक आहे एवढेच नव्हे तर भारतामध्ये अंतर्गत अस्थिरता,भ्रष्टाचार,दंगे, वाढता दहशतवाद, देश विघातक कारवाया, असे निर्माण होणारे प्रश्न आहेत याचे मूळ म्हणजे भारतातील दारिद्र्य होय. यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत समोर एक ज्वलंत आव्हान म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेतील दारिद्र्याकडे पाहणे आवश्यक आहे.

**संशोधनाचे निष्कर्ष**

1. भारतीय स्वातंत्र्यापासून दारिद्र्य निर्मूलनाचे प्रयत्न अविरतपणे आज सुद्धा केले जातात.
2. भारतातील दारिद्र्य रेषा निश्चित करण्याच्या निकषांमध्ये अभ्यासकात एक वाक्यता दिसून येते नाही.
3. भारतात शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात दारिद्र्याचे प्रमाण अधिक आहे.
4. दारिद्र्य निर्मूलन विषय उपाय-योजनांची अंमलवजावणी व त्याचे मूल्यमापन यामध्ये दोष आहेत.

**सारांश**

भारतातील दारिद्र्य एक आव्हान हा प्रस्तुत शोधनिबंध आधारे स्पष्ट होते की,भारतात दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे परंतु जागतिक स्तरावर दारिद्र्य कमी करण्याचे प्रयत्न भारत मोठ्या प्रमाणात करत आहे याचे कौतुक जागतिक बँकेकडून करण्यात आले आहे.एवढेच नव्हे तर जागतिक स्तरावर भारत दारिद्र्य निर्मूलन करण्यामध्ये अग्रेसर देश आहे हे स्पष्ट होते. भारतातील दारिद्र्य ही सामाजिक-आर्थिक समस्या असून त्यामध्ये समाजातील प्रत्येक व्यक्तीने दारिद्र्य निर्मूलनासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.त्याचबरोबर ज्या उपायोजनाची अमलवजावणी अतिशय काटेकोर आणि शिस्तबद्ध पद्धतीने झाली पाहिजे यामध्ये अनियमित आढळली तर कडक कारवाई करून या उपायोजना यशस्वी कशा पद्धतीने होतील याकडे लक्ष देण्याची गरज आहे. अन्यथा दारिद्र्य निर्मूलन होईल का हा प्रश्न माझ्यामध्ये अनुत्तरी असेल.

**संदर्भ**

1. mpscworld.com
2. कित्ता
3. रावसाहेब जाधव, 2004,भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकास विषयक समस्या, मीना प्रकाशन, सिंधुदुर्ग
4. https://mr.vikaspedia.in
5. mortal.mcgm.gov.in
6. https://www.nitinsir.in

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)